Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 C | Mar. 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
Multidisciplinary International E-Research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

- EXECUTIVE EDITOR OF THIS ISSUE -
Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Adarsh Arts & Commerce College, Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

४५. भारतीय स्त्रीयांच्या सक्षमीकरणात संविधानाचे योगदान
प्रा.मनोज सोनटक्के, प्रा.डॉ.मिलींद भगत ........ १३२
४६. सक्षम महिला आणि राजकारण
प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण ........ १३५
४७. महिलांचे आर्थिक सबलीकरण एक विवेचन
प्रा. डॉ.अपर्णा अ. पाटील ........ १३७
४८. मानवी अधिकार व महिला
डॉ. विजय टोंगे ........ १३९
४९. स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक आढावा
कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर ........ १४१
५०. ग्रामिण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे
प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी ........ १४४
५१. महिला आरोग्य प्रबोधन ही काळाची गरज
प्रा.डॉ.अर्चना आ. निखाडे ........ १४७
५२. आधुनिक भारतातील एक महान सेवाव्रती : साधनाताई आमटे
प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड ........ १४९
५३. स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप
डॉ. सौ. एम. आर. वलीवकर ........ १५१
५४. कायद्यातील तरतुदी व महिला सक्षमिकरण
डॉ.बी.व्ही.डोंगरे (पाटील) ........ १५३
५५. नैतीकता आणि महिला सशक्तीकरण
डॉ. मोहन दे. वानखडे ........ १५६
५६. महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग
डॉ. किशोर उत्तमराव राऊत ........ १५९
५७. महिला व राजकारण
प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ ........ १६२
५८. कौटुंबिक कलह सोडविण्यांत महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका
प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे ........ १६४
५९. महिलांचे राजकारणात सहभाग
प्रा. डॉ. सुधाकर जावळे ........ १६६
६०. आंबेडकरी विचारदृष्टी आणि स्त्री मुक्ती
प्रा.डॉ. युवराज श्रीराम मानकर ........ १६९
६१. महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार
प्रा. राजु दयारामजी चावके ........ १७३
६२. अहिंसा : गांधीचींचा विचार आशय
डॉ. माधव लक्ष्मणराव सोनेकर. ........ १७५
६३. संत नरहरी सोनार
प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे ........ १७८
६४. महिला सबलीकरण एक आव्हान
प्रा. डॉ. दीपक आनंदराव चौरपगार ........ १८१
६५. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार
प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे ........ १८३
६६. ग्रामीण पर्यटन : संधी व आव्हाने
प्रा. निलेश दे. हलामी ........ १८६
६७. भारतीय अर्थव्यवस्थेवर काळया पैशाचा प्रभाव
प्रा.डॉ. जयेश मो. अवथरे ........ १८८
६८. बालकांचे हक्क आणि भीक मागणारी रस्त्यावरील मुले
निलेश रामराव मगर ........ १९१



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# ग्रामिण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे

**प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी**
सहाय्यक प्राध्यापक
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली. पीन कोड. ४४१२०७

भारतीय संस्कृतीमध्ये भारतीय स्त्रीचे स्थान अत्यंत गौरवाचे व आदराचे आहे. स्त्रीला पत्नी म्हणून, आई म्हणून, काकू म्हणून, सासू म्हणून तसेच सून, मुलगी म्हणून सुद्धा महत्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. इतिहासामध्ये सामर्थ्यवान, धैर्यवान व बुध्दिमान स्त्रियांची उदाहरणे आढळतात. जसे वैदिककाळात द्रौपती, सीता, मैत्रयी, मध्ययुगातील झुंझार लढवय्या व कुशल राज्यकर्त्या अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी दुर्गावती, तर आधुनिक काळात सावित्रीबाई फुले इत्यादी. पण हे सर्व अपवादात्मक उदाहरणे आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अनेक वर्षानंतरही आजचे भारतीय स्त्रीचे जीवन कसे आहे? कुटुंबातील व समाजातील तीचे स्थान कोणते आहे? यासारखे प्रश्न वारंवार उपस्थीत होतात. आज स्त्रियांना शिक्षणाचे दालन उघडे झाले आहे, तशा महिला शिक्षण घेवून पुरूषांच्या बरोबरीने काम करीत आहेत, त्या वरच्या हुद्यावर काम देखील करीत आहेत. तसेच लठ्ठ पगाराची नोकरी करीत आहेत. भरपूर पगार असलेली महिला आर्थिकदृष्टया स्वतंत्र असूनही घरात मात्र परिस्थिती वेगळी आहे. शहरी आणि सुशिक्षीत कुटुंबांमध्ये ही स्थिती तर ग्रामिण, निरक्षर, वनवासी स्त्रियांची स्थिती किती चिंताजनक असेल याची आपण कल्पना करू शकत नाही. आजही लग्नाच्या पाठोपाठ अनेक स्त्रीया हुंड्याच्या समस्येपायी, सासरकडील छळापायी आत्महत्या करतात; बलात्कार, अपहरण, तिव्र वेदना, पीडा, त्रास, छळ, लैगिंक अत्याचार इत्यादीसारख्या प्रकाराला बळी पडतात.

आज २१व्या शतकात भारतीय स्त्रियांनी मोठया प्रमाणात प्रगती केली आहे. इ. सन पुर्व काळात स्त्रियांची परिस्थिती ही अत्यंत हलाखीची होती. राजाराममोहन रॉय व ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांच्या अडचणी समजून त्यांना त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखवला. महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिकवून पुण्यात मुलीसाठी पहिली शाळा काढली. यामुळे शिक्षणाचे महत्व मुलींना कळले व त्यामुळे आज २१ व्या शतकातसुध्दा स्त्रिया या पुरूशांच्या बरोबरीने शिकून मोठमोठ्या अधिकारी पदावर काम करतांना दिसत आहेत. राजाराममोहन रॉय यांनी विधवा पुर्नविवाह याला पाठिंबा दिल्यामुळे आजच्या काळात स्त्रियांचे पुर्नविवाह होत आहेत. इ.स. पुर्व मध्ये हुंडाबळी ही समस्यासुध्दा होतीच पण आजसुध्दा २१ व्या शतकात स्त्रियांना हुंडाबळी या समस्येला सामोरे जावे लागते. या हुंड्यामुळे कित्येक मुलींचे आणि त्यांच्या आई-बाबांचे आयुष्य उध्वस्त होत. हुंड्यामुळे कित्येक मुलींना शारीरिक, मानसिक त्रासांना सामोरे जावे लागते. याचा परिणाम त्या मुलींच्या मानसिक स्वास्थावर तसेच शारीरिक स्वास्थ्यावर होतो. शिवाय त्या मुलींच्या घरच्यांनासुध्दा सहन करावा लागतो. काही ठिकाणी मुली कितीही शिकल्या तरी त्यांना या सर्व त्रासांमुळे स्वत:चा जीव गमावून आयुष्य संपवावे लागते.

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरूष समानता मान्य केलेले आहे. आजची महिला पुरूषांच्या बरोबरीने सर्व कार्यक्षेत्रात काम करीत आहे. तरीपण महिलेला दुय्यम दर्जाचे स्थान कां आहे? चुल आणि मुल एवढेच तिचे कार्यक्षेत्र आहे असे मानले गेले. एकीकडे स्त्री म्हणजे त्यागाची मुर्ती मानले. सरस्वती, दुर्गा, लक्ष्मीची पुजा केली जाते. तिला अर्धांगीनी म्हणून समाजात स्थान दिले आहे. कोणतेही शुभ कार्य अर्धांगिनीशिवाय पुर्ण केले जात नाही. स्त्री कुटुंबाचा पाया आहे. दुसरीकडे दारू पिणारा, बायकोला मारझोड करणारा अशिक्षीत माणूस स्त्रीला उपभोग्य वस्तू समजतो. हा विरोधाभास महिलेचे गौणत्वच सिध्द करतो.

स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार कमी करण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले असूनही बलात्कार,अपहरण, लैगिंक अत्याचार, त्रास, तिव्र वेदना यासारख्या मोठया प्रमाणावर अन्याय अत्याचार वाढत आहेत. हुंड्यामुळे महिलावरील अत्याचार होत आहेत हे माहित असूनही हुंडा प्रथा बंद होत नाही. कारण स्त्रियांच्या मनावर खोलवर रूजलेल्या रूढी, परंपरा होय. नवरा म्हणजे पती परमेश्वर. त्याने कितीही अत्याचार केले तरी ते स्त्री सर्व सहन करीत असते. म्हणूनच तीची मानसिकता बदलत नाही, तिला अत्याचाराची जाणीव होत नाही तोपर्यत कितीही कायदे झाले तरी महिलावरील अत्याचार कमी होणार नाहीत. शिक्षणाचा अभाव, संधीचा अभाव, अन्याय, अत्याचार, कुटुंबातील महिलेचे दुय्यम स्थान, पुरूषाशी वर्चस्व, समाजाची स्त्रीविषयक मानसिकता असे अनेकविध प्रश्न आहेत. त्यांचा मुलगामी विचार करून आणि दूरगामी परिणाम लक्षात घेऊन व्यापक समाजपरिवर्तनासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, समान संधी, समान दर्जा याव्दारे महिलांचा विकास, महिलांची प्रगती सर्वच क्षेत्रात व्हायला हवी. पण हा विकास फक्त वैयक्तिक पातळीवर व एकांगी असून चालणार नाही. महिला सर्वार्थाने सबल होण्याची आज आवश्यकता आहे.

प्रत्येक स्त्री हा कुटुंबाचा, समाजाचा व राष्ट्राचा एक महत्वपूर्ण घटक आहे. म्हणून तिच्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच ग्रामविकासाशी, समाजाशी व राष्ट्राच्या उन्नतीशी असलेल्या तिच्या नात्याचं भान तिला येण्याची आज गरज आहे. तिच्यातील सामाजिक बांधिलकी दृढ होऊन ती सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांबाबत जागरूक व क्रियाशील झाली पाहिजे. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, सुरक्षा अशा सर्वच क्षेत्रात महिलांचा परिणामकारक सहभाग वाढवायला पाहिजे.

सबलीकरण ही एक कृतिशील बहुआयामी प्रक्रिया आहे जी महिलांना स्वत:ची ओळख व जीवनाच्या सर्व क्षेत्रातील अधिकार याबाबतची जाणीव होण्यास सक्षम करते. सबलीकरण याला सामथ्यशीलता, सशक्तीकरण हे प्रतिशब्द आहेत. सामर्थ्य वा अधिकार



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ही काही एखादी वस्तू नव्हे की जिचे हस्तांतरण केले जाते व जी दानाच्या रूपात कोणाला दिली जाते. अधिकार वा सामर्थ्य हे संपादन करावे लागते व एकदा संपादन केल्यावर त्याची अंमलबजावणी करावी लागते. त्यात सातत्य ठेवावे लागते तसेच त्याचे रक्षण वा जोपासना करावी लागते. महिलांनी स्वत:च स्वत:चे सबलीकरण करणे महत्वाचे आहे. याचा अर्थ असा की त्यांनी सध्या कुटुंब, समाज, शिक्षण, राजकारण व आर्थिक क्षेत्रात असलेली असमानता व त्यामागची कारणे जाणून घेणे व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक ते बदल घडवून आणण्याच्या कामात स्वत: पुढाकार घेणे आवश्यक आहे.

हया सबलीकरणाचा ग्रामिण व नागरी क्षेत्रातील महिलांच्या दृश्टीने विचार होणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे सबलीकरण ही संकल्पनादेखील सापेक्ष आहे. ज्या स्त्रीने आजपर्यत घराचा उंबरठा ओलांडला नाही तिने घरातील उंबरठा ओलांडून वर मोकळ्या आकाशाकडे पाहणे यासाठी तिला संधी मिळाली व ती तसे करू शकली तर ते देखील तिचे सबलीकरण आहे असे म्हणावे लागेल.

**महिलांच्या सबलीकरणाची क्षेत्रे :**

**१. कौटुंबिक :** मुलीचा जन्म झाला तर तीच्या जन्माचे सर्वत्र स्वागत करायला पाहिजे. याविषयी स्त्रीयांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे.

अ) **समानता व संधी :** घरातील स्त्री-पुरूषांनी मुला मुलीच्या शिक्षण, खेळ इ. प्रकारच्या गोष्टीत भेदभाव करायला नको. त्यांच्या संगोपनात फरक न करता समानतेने वागविले पाहिजे. ज्या प्रमाणे मुलांना शिक्षणाच्या किंवा इतर कामाच्या नव्या संधी देता तशाच प्रकारच्या संधी मुलींनाही मिळावयास पाहिजे. मुलांप्रमाणे मुलींनाही चांगली वागणूक दिली पाहीजे.

ब) **आत्मसन्मान :** स्त्रीने आपल्या घरातील कामे केली तर कुटुंबियांनी तिच्या कामाची किंमत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे कारण स्त्रीने घरात दिवसभर केलेल्या कामाला पैसे मोजावे लागत नाहीत. तिच्या कामाचे मोल कोणाला वाटत नाही. ह्याबाबतीत स्त्रियांनीही आम्ही नोकरी करत नाही म्हणजे काहीच करत नाही, घरीच असते अशी भूमिका घेणे सोडून द्यावे. या दृष्टीने प्रयत्न केल्यास तिची स्व प्रतिमा उज्वल होण्यास मदत होईल. घरातील सूनेला मुल न झाल्यास तिचाच दोष आहे, वैधता आल्यास किंवा घरात अघटित घटना घडल्यास तिचा पायगुण बरोबर नाही, शुभ अशुभ घडले तरी तिच्याच माथ्यावर फोडले जाते. मातापित्यांना अग्नी देणे, पिंडदान, कन्यादान इ. फक्त पुरूषानेच करावे इ. बाबत वैचारिक परिवर्तन होणे गरजेचे आहे.

क) **स्व-आग्रह वा स्व-मत प्रतिपादन :** स्त्री ही कुटुंबाचा एक महत्वाचा घटक म्हणून, एक मानव म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणे, तिचा आदर करणे व एक व्यक्ती म्हणून तिला मान्यता दिले जाणे. एक व्यक्ती म्हणून स्त्रीलाही स्वत:चे काही विचार, भावना, मते, इच्छा आंकांक्षा असतात हे जाणून त्याच्या प्रकटीकरणाला संधी देणे व दैनंदिन व्यवहारात त्यावर अंमलबजावणी करणे. या मनोवृत्तीत बदल घडवून आणणे.

ड) **निर्णयक्षमता :** घरातील संपुर्ण जीवनात व सामाजिक जीवनातील दैनंदिन व प्रासंगिक घडामोडी संदर्भात निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे, यातून निर्णयक्षमता वाढते. उदा. कौटुंबिक सण, नातेवाईकांच्या भेटीगाठी, प्रवास, सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग, लग्नसमारंभ इ. चे वेळी करावयाचा खर्च, भेटवस्तू देणे, सहल तसेच संगीत अभिनय इ. कलागुणांच्या विकासासंदर्भात तसेच मुलांचे शिक्षण, नोकरी, व्यवसाय विवाह इ. बाबतीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे.

**२. आरोग्य :** मुलींना वैद्यकीय मदत पुरविणे, स्त्रियांचा स्वत:चा आहार आरोग्य तपासणी, मुलाबाबत तसेच पालकत्वाबाबत मुल हवे की नको? असल्यास केव्हा, किती मुले? इ. बाबतचा निर्णय संततिनियमनाची साधने वापरण्याबाबतचा निर्णय घेण्याची क्षमता देणे.

**३. आर्थिक :** स्त्री-पुरूषांना अर्थार्जन करण्यासाठीसमान संधी देणे, समान कामासाठी समान वेतन देणे, उत्पन्न किंवा मिळकत खर्च करण्याचे स्वातंत्र्य, संपत्ती धारण करणे, तिचे हस्तांतरण करणे तसेच संपत्तीची विल्हेवाट लावणे, स्त्रीधनाची मालकी, हस्तांतरण इ. बाबत स्वातंत्र्य देणे.

**४. सामाजिक :** स्त्री व पुरूषांचे स्थान समान. पुरूष हा स्त्रीचा संरक्षक व स्त्री अबला उपभोग्य वस्तू ही मनोवृत्ती दूर करण्याचे दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. दूरदर्शनवरील योगासनांच्या कार्यक्रमात पुरूष पूर्ण कपड्यात तर स्त्री तोकड्या, जाहिराती फॅशनशो सौंदर्यस्पर्धा यांच्या माध्यमातून स्त्रीदेहाचे प्रदर्शन याबाबत जनमानसात वैचारिक परिवर्तन, प्रसारमाध्यमे व साहित्य यातून स्त्री ही अबला, निराधार, अनाथ अशी प्रतिमा तयार होते किंवा याउलट विकृत प्रतिमा तयार केली जाते त्याबाबत जाणीव जागृती करणे.

**५. कायदेषीर :** स्त्रियांसाठी असलेल्या कायद्याबद्दल माहिती देणे. व्दिभार्याप्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, दत्तक विधान व पालकत्वाचा कायदा, वारसाहक्काचा कायदा, मुलांच्या नैसर्गिक पालकत्वाचा कायदा ४९८ अ, कामाच्या ठिकाणी होणारा स्त्रियांचा छळ, इत्यादी बाबत जाणीव करून घेणे.

**६. राजकीय :** राजकारणात पुरूषांबरोबरच स्त्रियांना सहभाग करून समान संधी देणे. ग्रामपंचायत, विधानसभा, लोकसभा या सारख्या राजकीय क्षेत्रातून संधी मिळाली तर महिलांचे सबलीकरण करण्यात मदत होते. शासकीय योजना धोरण व त्यांच्या अंमलबजावणीत सहभाग करून घेतले पाहिजे. राजकीय क्षेत्रात प्रवेश व शासकीय धोरणात संधी मिळाल्यास त्यांचे सबलीकरण होऊ शकते.

शिक्षणाचा अभाव, संधीचा अभाव, अन्यांय, अत्याचार, कुटुंबातील महिलेचे दुय्यम स्थान, पुरूशी वर्चस्व, समाजाची



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

स्त्रीविशयक मानसिकता असे अनेक प्रश्न आहेत. त्यांचा मुलगामी विचार करून आणि दुरगामी परिणाम लक्षात घेऊन व्यापक समाजपरिवर्तनासाठी संघटीत प्रयत्नांची आवश्यकता आहे. ग्रामिण व नागरी तसेच शिक्षीत वा अशिक्षीत महिलांच्या सशक्तीकरणाच्या ह्या कामामध्ये अशासकीय संघटना (NGO) सामाजिक संघटना, महिला संघटना, महिला मंडळे, युवती मंडळे, स्व.सहायता गट, समाज कार्यकर्ते, शासनाचे संबंधीत विभाग इ. च्या मार्फत प्रयत्न केले जात आहेत. परिसंवाद चर्चा याबरोबरच पथनाट्य, समुहगान, प्रदर्शनी, कठपुतलीचे प्रयोग, अंधश्रध्दा निर्मुलनाचे प्रयोग इ. अनेक सांस्कृतिक, बौध्दिक, सामुहिक व सार्वजनिक कार्यक्रमांव्दारे हे कार्य केले जाऊ शकते. विचारांच्या आदान-प्रदानाने, विचारमंथनाने व त्यांच्या अंमलबजावणीने महिलांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळू शकेल.

**सारांश :**

या संदर्भात एक गोश्ट महत्वाची आहे. स्त्रियांचे प्रश्न हे केवळ स्त्रियांचे प्रश्न नसून ते संपूर्ण समाजाचे प्रश्न आहेत. म्हणून स्त्रियांच्या सबलीकरणाचे महत्व पुरूषांनीही लक्षात घेण्याची गरज आहे. ह्या कार्यात पुरूषांचा सहभाग असण्याच्या दृष्टीने पुरूषांच्या प्रबोधनाची गरज आहे. समाजातील सर्व घटकांशी संवाद साधण्याची व त्यांच्यापर्यत पोहोचण्याची आवश्यकता आहे. कुटुंबातील स्त्रीचे सबलीकरण सशक्तीकरण झाल्यानंतर तिचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैधानिक इ. क्षेत्रातील सबलीकरण शक्य होणार आहे आणि याची सुरूवात आपल्या स्वतःच्या घरापासून व्हायला हवी आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सहकार्य व सहभाग यात आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वजण प्रयत्नशील असने गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. भारतीय समाज समस्या आणि प्रश्न, लेखक-डॉ. तोशणीवाल, विश्व पब्लिशर्स डिस्ट्रिब्यटर्स, नागपूर. पृष्ठ क्र. १६४, १६५, १६८, १८१, १८२.

२. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, लेखक- डॉ. बी.एम. कऱ्हाडे, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर. पृष्ठ क्र. २३७, २३८, २४१, २४७.

३. महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान - नंदिनी तडकलकर.

४. दैनिक तरूण भारत पुरवणी

५. www.google.com

Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli